जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- ३.५.९४

प्रति,
शिक्षणाधिकारी[प्राथमिक विभाग],
जिल्हा परिषद पुणे-११.

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एडीएलएस-१०९३/(७९००)/प्राशि दिनांक २०.१२.९३ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन जून १९९३ पासुन इ. १ली ते सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणुन परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| मिशॉम ऑफ रिटेबल ट्रस्ट पवई, मुंबई | अल्फोन्सानगर-काळेवाडी | जून १९९३ मध्ये इ.१ ली ते आठवीच्या प्रत्येक [illegible] | इंग्रजी |

२.१ सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२. शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकुल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३. शाळेत, शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्याच सेवाशर्तींच्या अधिन राहुन नेमला पाहिजे.

..२..

S. S. Shaji

PRINCIPAL
Alphonsa High School
Kalewadi, Pune - 411 017

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विधायक सु
इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५. संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्य आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६. संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचा-यांसाठी विहित नोंद वहया अध्यायावत व विश्वसार्ह स्वरूपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७. संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे कार्यपध्दतीचे नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२. शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज समक्ष क्षेत्रिय अधिका-याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील अन्यथाशासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षा-नंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

[redacted]

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्ण खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेंला खाजगी शाळेची <u>मान्यता</u> देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणेनोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरूध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

..३..

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैर व्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत कुठलेही प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.]

७] शासनाची मंजुरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/-दंडसंस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतीवर शि.उ.सं. यांची सही आहे

(सही)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत-
प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/~~नगरपालिका~~ शिक्षण मंडळ, पिंपरी, पुणे - १८
जिल्हा-------------------यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत-
मा. सचिव--~~सिरो मलबार चॅरिटेबल ट्रस्ट, पवई - मुंबई~~.
------------------------------यांना माहितीसाठी अग्रेषित.

(सही)
PRINCIPAL
Alphonsa High School
Kalewadi, Pune - 411 017